महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ८९ दिनांक १३/११/२००६

विषय : कंपनीचे काम करीत असताना अपघात झाल्यास उपचारापोटी केलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या प्रतिस्वाक्षरीची अट शिथिल करण्याबाबत.

संदर्भ : १) स.स्था.आदेश क्र.३७७ दि.३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२ दि.१८.२.५८
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि.१९.५.२००६.

.....

स.स्था.आ.क्र.३७७ दि.३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२ दि.१८.२.१९५८ अनुसार कर्मचा-यास कामावर असताना अपघात झाल्यास त्यावर तात्काळ उपचार सुरु करता यावे म्हणून तात्पुरती अग्रिम रक्कम मंजूर करण्यात येते. तसेच वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्याचे सुधारित अधिकार प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि.१९.०५.२००६ अन्वये प्रकरणपरत्वे निगम कार्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील अधिका-यांना देण्यात आले आहेत.

२. विद्यमान तरतुदीनुसार अपघाती कर्मचारी बरा होऊन पूर्ववत कामावर रुजू झाल्यानंतर झालेल्या खर्चाच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठीचे देयक वैद्यकीय अधिकारी/जिल्हा शल्य चिकीत्सक यांची प्रतिस्वाक्षरी असल्याखेरीज मंजुरीसाठी ग्राह्य धरले जात नाही. तथापि, असे अनुभवास आले आहे की संबंधित कर्मचा-यास वैद्यकीय अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक यांची स्वाक्षरी मिळविण्यासाठी अनेक अडचणी येतात किंवा अतिरिक्त खर्च देखील करावा लागतो. त्यामुळे प्रतिपूर्तीचा प्रस्ताव संबंधित कार्यालयास पाठविण्यास विलंब होतो.

३. हा विलंब टळावा आणि उपरोल्लेखित वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबतच्या प्रकरणांचा निपटारा जलद व्हावा या दृष्टीने व्यवस्थापकीय संचालक यांनी, सदर कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीने केलेल्या शिफारसी मान्य करुन खालीलप्रमाणे नियमामध्ये तरतूद करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार ,

एक) अपघात झालेल्या महावितरण कंपनीच्या कर्मचा-याला रु.१०,०००/- पर्यंतच्या वैद्यकीय प्रतिपूर्ती बिलाच्या मंजुरीसाठी वैद्यकीय अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या प्रतिस्वाक्षरीची अट शिथिल करण्यात आली आहे ;

दोन) क्षेत्रीय कार्यालयातील अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता यांना प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि.१९.०५.२००६ अन्वये दिलेल्या अधिकारांनुसार, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस प्रकरणपरत्वे मंजुरी देण्यासंबंधीच्या म्हणजेच रु.१०,००१/- ते रू.३०,०००/- पर्यंतच्या बिलांवर वैद्यकीय अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांची प्रतिस्वाक्षरी असणे आवश्यक राहील ;

तीन) प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि.१९.०५.२००६ अन्वये रू.३०,००१/- आणि त्यावरील रकमेसाठीच्या प्रतिपूर्तीस मंजुरी देण्याचे अधिकार निगम कार्यालयातील सक्षम अधिका-यांना प्रदान केले आहेत. त्यानुसार, सदर बिले कंपनीचे वैद्यकीय सल्लागार यांच्याशी विचारविनिमय करुन मंजूर करण्यात येत असल्याने अशा बिलांवर वैद्यकीय अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या प्रतिस्वाक्षरीची अट शिथिल करण्यात आली आहे ;

चार) अपघात झालेल्या कर्मचा-याने कामावर पूर्ववत रुजू झाल्यापासून ३० (तीस) दिवसाच्या आत वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी बिल सादर करणे आवश्यक राहील. विहित मुदतीत बिल सादर न केल्यास अशी मागणी दप्तरी दाखल करण्यात येईल व अदा केलेली अग्रिम रक्कम संबंधित कर्मचा-यांच्या मासिक वेतनातून योग्य हप्त्यात वसूल केली जाईल.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे आणि ते जारी केल्याच्या तारखेपासून लागू होईल.

(सु. य. पाटील)
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :

१) विभागीय व त्यावरील स्तराची क्षेत्रीय कार्यालये { यांना महावितरण कंपनीच्या
२) निगम कार्यालयातील विभाग प्रमुख व कक्ष प्रमुख { प्रेषण यादीनुसार

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/ No 1 3 9 5

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

दिनांक : 15 JAN 2007

# शुद्धिपत्र

(प्रशासकीय परिपत्रक क्र. ८९ दिनांक १३/११/२००६)

विषय : कंपनीचे काम करीत असताना अपघात झाल्यास उपचारापोटी केलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या प्रतिस्वाक्षरीची अट शिथिल करण्याबाबत.

.....

प्रशासकीय परिपत्रक क्र.८९ दि.१३.११.२००६ मधील परिच्छेद क्र.३ (दोन) मध्ये चौथ्या ओळीत नमूद केलेल्या 'वैद्यकीय अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांची प्रतिस्वाक्षरी असणे आवश्यक आहे' यात बदल करुन सदर परिच्छेद क्र.३ (दोन) आता खालीलप्रमाणे वाचावा :-

*३ (दोन) - "क्षेत्रीय कार्यालयातील अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता यांना प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि.१९.०५.२००६ अन्वये दिलेल्या अधिकारांनुसार, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस प्रकरणपरत्वे मंजुरी देण्यासंबंधीच्या म्हणजेच रु.१०,००१/- ते रु.३०,०००/- पर्यंतच्या बिलांवर वैद्यकीय अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक यांची प्रतिस्वाक्षरी असणे आवश्यक राहील".*

२. प्रशासकीय परिपत्रक क्र.८९ दि.१३.११.२००६ मध्ये अंतर्भूत असलेल्या इतर सर्व बाबी अबाधित राहतील.

(सु. य. पाटील)
मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रत :

१) विभागीय व त्यावरील स्तराची क्षेत्रीय कार्यालये { यांना महावितरण कंपनीच्या
२) निगम कार्यालयातील विभाग प्रमुख व कक्ष प्रमुख { प्रेषण यादीनुसार

*K/Adm.Cir – Medical -7*
*2/1/07*